# प्रेस नोट दि.०४/१०/२०१७

## (बेकायदेशिर अग्नीशस्त्र बाळगणा-या रेकॉर्डवरील गुन्हेगारास गुन्हे शाखेचे गुंडा स्कॉड दक्षिण विभागाने केले अटक )

---

पुणे शहर गुन्हेशाखे कडील संघटीत गुन्हेगारी विरोधी पथक दक्षिण विभागा मध्ये कार्यरत असणारे पोनिरी श्री.राम राजमाने व त्यांचा स्टाफ हे दि.०३/१०/२०१७ रोजी डेक्कन पोलीस स्टेशनचे हद्दीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग फिरत असताना फिरत फिरत डेक्कन पोलीस स्टेशन हद्दीच्या जंगली महराज रोडवर १९/२५ वा चे सुमारास डेक्कन पी.एम.टि बस स्टॉप येथे आले असता स्कॉड मधील पोलीस कर्मचारी कैलास साळुंके यांना त्यांचे बातमीदारा कडुन बातमी मिळाली कि, डेक्कन येथे नदीपात्र रोडचे बाजुला पांचाळेश्वर मंदिरासमोर, लकडी पुलाखाली, डेक्कन, पुणे येथे शहरातील रेकॉर्ड वरिल गुन्हेगार नामे अजहर शेख रा.गुलटेकडी, पुणे हा त्याचे जवळ गावठी कट्टा असुन तो कट्टा विक्री साठी थंबला आहे. त्याचे अंगात निळे रंगाचा टि शर्ट व राखाडी व काळी रंगाची ट्रक पॅन्ट घातलेली व डोक्याचे केस मागे विचंरलेले आहेत. व त्याचे जवळ निळे रंगाची पिशवी आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाली. सदरचे बातमीप्रमाणे खात्री करता बातमीप्रमाणे वर्णनाचा इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अजहर अन्सार शेख ऊर्फ साया वय-२२ वर्ष रा- मिनाताई ठाकरे वसाहत, सार्वजनिक संडसाचे जवळ, गुलटेकडी, पुणे असे सांगीतले. त्याचेकडे मिळालेल्या बातमीप्रमाणे गावठी कट्टा व राऊंड बाबत सखोल चौकशी करता त्याचे डाव्या हातात असलेली कापडी निळे रंगाची पिशवी मागे लपवु लागला. त्याचे हातातील निळे रंगाची पिशवी चेक केली असता त्यामध्ये पेपर मध्ये गुंडाळलेले एक देशी बनावटीचे गावठी पिस्टल मिळुन आले ते चेक करता त्याचे मॅगजिन मध्ये दोन जिवंत काडतुसे मिळाले. असा एकुण मिळुन २६,०००/- चा मुद्देमाल गुन्हयाचे अनुषंगाने जप्त करण्यात आला आहे. त्याचे विरुध्द कैलास साळुंके यांनी डेक्कन पो.ठाणे गु.र.न.२५३/२०१७ आर्म ॲक्ट कलम ३ (२५) व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७ (१), सह १३५ प्रमाणे फिर्याद दिली आहे. गुन्हा दाखल करणेत आला असुन तपासकामी त्याची मा.न्यायालयातुन पोलीस कस्टडीची रिमांड घेणेत आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रविण तापकिर हे करित आहेत.

**वर नमूद आरोपी अजहर अन्सार शेख ऊर्फ साया याचे विरुध्द कोंढवा, खडक, स्वारगेट, पिंपरी, मार्केटयार्ड, पो.ठाणे येथे गर्दी चोरी, जबरी चोरी, बेकायदेशिर रित्या अग्नीशस्त्र बाळगणे या प्रकारचे अनेक गुन्हे दाखल आहेत.**

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे., श्री.पंकज डहाणे सो,पोलीस उप आयुक्त,गुन्हे., श्री.सुरेश भोसले सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान, सहा.पो.फौज.कदम, कैलास साळुके, प्रविण पडवळ, गणेश साळुकें, प्रविण तापकीर, प्रशांत पवार, विवेक जाधव, अजय उत्तेकर, किरण ठवरे नितीन रावळ, रमेश चौधर, राकेश खुणवे, संभाजी गंगावणे यांनी केली आहे.